# देगलूरच्या ४ खेळाडूंचा आंतर विद्यापीठीय स्पर्धेत सहभाग

**देगलूर/ प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, येथे होणाऱ्या २४ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठीय क्रीडा महोत्सव स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेडच्या संघात देगलूर महाविद्यालयाचे खेळाडू सम्प्रता इबितवार, सपना अल्लापूरकर हे व्हॉलीबॉल मध्ये तर अनिल हेमनार ४०० मी व मारोती घंटेवाड १०० मीटर धावणे स्पर्धेत सर्वप्रथम येत आंतर विद्यापीठीय क्रीडा महोत्सवासाठी निवड झाले आहेत.



प्रशिक्षक डॉ.नीरजकुमार उपलंचवार व प्रा. सीताराम हाके यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले.अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार ,उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सूर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी सदस्य राजकुमार महाजन, डॉ कर्मवीर उनग्रतवार , देवेन्द्र मोतेवार ,गंगाधर जोशी,जनार्दन चिद्रावार,रवींद्र द्याडे, चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार, उपप्राचार्य एम.एम.चमकुडे,प्रसिध्दी प्रमुख डॉ.बी. आर. कत्तूरवार,पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील , कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी नळगीरकर यांनी कौतुक केले आहे.

Scanned with OKEN Scanner